महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - ४०० ७०३

परिपत्रक क्र. मुविमं/उमाप (इ.१२ वी)/आवेदनपत्र/ फेब्रु./मार्च - २०२५/२०८/३५०४ दि. ०८/९/२०२५

विषय :- फेब्रु./मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरतांना घ्यावयाच्या महत्त्वाच्या सूचनांबाबत.

संदर्भ :- १. क्र.रा.मं./परीक्षा-३/ ३०७०, दि. ०४/०९/२०२५ चे पत्र.

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत **फेब्रुवारी / मार्च २०२६** मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इयत्ता १२ वी)** परीक्षेच्या नियमित विद्यार्थी, पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार तारखा जाहीर झालेल्या आहेत.

विद्यार्थ्यांची आवेदनपत्र अपलोड करताना खालीलप्रमाणे सूचनांचे पालन करावे.

१. आवेदनपत्र अपलोड करताना विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव /आईचे नांव व जन्म तारखेची नोंद व इतर माहिती जनरल रजिस्टर वरील नोंदीप्रमाणेच अचूक भरावी.

२. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना विद्यार्थी प्रकारानुसार खालीलप्रमाणे आवेदनपत्र क्रमांक देण्यात यावेत.

अ.क्र.	विद्यार्थ्याचा प्रकार	आवेदनपत्र क्रमांक
१	नियमित विद्यार्थी	०००१ ते ५०००
२	पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी	५००१ ते ६०००
३	खाजगी विद्यार्थी	६००१ ते ७०००
४	श्रेणी सुधार विद्यार्थी	७००१ ते ८०००
५	तुरळक विषय	८००१ ते ९०००
६	योग्यता प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी	९००१ ते १००००

उपरोक्त प्रमाणे विद्यार्थ्याच्या आवेदनपत्रास क्रमांक देताना प्रथम विज्ञान शाखेचे, त्यानंतर कला शाखेचे व त्यानंतर वाणिज्य शाखेचे असे सलग क्रमांक देण्यात यावेत. **ऑनलाईन आवेदनपत्र क्रमांक दिल्यानंतर आवेदन पत्र क्रमांक Edit करता येत नाही , आवेदनपत्र अपलोड केल्यानंतर Edit करण्याचा प्रयत्न केल्यास एकाच विद्यार्थ्याची दोन वेळा नोंद होवून परीक्षा शुल्काची रक्कम नियमानुसार कनिष्ठ महाविदयालयास दोनदा भरावी लागेल. तसेच सदर एक आवेदनपत्र रद्द करण्याकरिता मंडळ नियमानुसार पुन:श्च रुपये १०००/- शुल्क भरावे लागेल. तरी आवेदनपत्र क्रमांक अचूक भरण्यात यावे.**

३.आवेदनपत्रात विद्यार्थ्याचा **विषय कोड क्रमांक क्रमवार नोंदवावेत, उत्तर लेखनाची भाषा (Lang of Ans. Code No.)** व इतर माहिती भरताना योग्य कोड नंबर अचूक नमूद करण्यात यावा.

४. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात मान्यता असलेल्या **शाखा/विषय/ माध्यमानुसारच** विषय घेणे आवश्यक आहे.

५. पर्यावरण शिक्षण (EVS) (विषय कोड क्रमांक - ३१) व आरोग्य व शारीरिक शिक्षण (PT) (विषय कोड क्र.- ३०) या ग्रेड विषयास आवेदनपत्रामध्ये माध्यम कोड क्रमांक नमूद केला जात नाही असे निदर्शनास आलेले आहे. तरी माध्यमाचा कोड क्रमांक न चुकता नमूद करावा.

६. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी सर्व विषय घेवून प्रविष्ठ होत असल्यास पर्यावरण शिक्षण (EVS) आरोग्य व शारीरिक शिक्षण (PT) या विषयात प्रविष्ठ दर्शविण्यात यावे व **Non Exempted** चा कोड देण्यात यावा.

७. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी पूर्वीची विषय सूट घेणार असल्यास त्याच्या **सर्व गुणपत्रिका तपासून ज्या विषयात सुट आहे त्या विषयात सूट नमूद करावी व Claimed Total No.of Exemptions** दर्शविण्यात यावा.

८. नियमित खाजगी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरतांना ज्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झाले आहेत अशाच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यात यावेत तसेच खाजगी पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रात यापूर्वीच्या नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) वरील क्रमांकाची अचूक नोंद करावी.

९. जे नियमित विद्यार्थी परराज्यातून / परदेशातून आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची **योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मंडळाकडून** प्राप्त झालेले आहेत त्यांचा क्रमांक आवेदनपत्रात अचूक नमूद करावा व ज्याचे **(Eligibility Certificate) मंडळाकडून** प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यात येवू नये. त्यासाठी योग्यता प्रमाणपत्राची कार्यवाही वेळेत करून घ्यावी.

१०. एखादया विद्यार्थ्यास चुकीचा नांव नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (Enrollment Certificate) व योग्यता प्रमाणपत्र क्रमांक (Eligibility Certificate) देवून आवेदन पत्र अपलोड केल्याचे निदर्शनास आल्यास मंडळ नियमानुसार कडक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी

११. दिव्यांग विद्यार्थ्याचा दिव्यांग प्रवर्गानुसार मंडळाने निर्धारित केलेला दिव्यांग कोड आवेदनपत्रात अचूक नमूद करावा. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव मंडळाकडे त्वरित पाठवावेत. सदर प्रस्ताव मंडळात उशिरा सादर केल्याने विद्यार्थ्यास संबंधित सवलती न मिळाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१२. मंडळाचे दिव्यांग सवलतीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सदरचे पत्र कायम अभिलेख म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात जतन करावे. सदरच्या दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी पुनर्परिक्षार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वी प्राप्त सवलतीच्या पत्राची प्रत मंडळात सादर करावी. पुन:श्च प्रस्ताव सादर करण्यात येवू नये.

श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) साठी विशेष सूचना

१. आपल्या कनिष्ठ महाविदयालयातून श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांची श्रेणीसुधार योजनेच्या नियमानुसार प्रथम प्रविष्ट झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिकेतील विषय, माध्यम विद्यार्थ्यास घेणे आवश्यक असल्याने त्याची खात्री करूनच आवेदनपत्र अपलोड करावे. अशा विदयार्थ्यांचा CIS कोड - ४ आवश्यक असून जर चुकून नियमित विदयार्थ्याचा कोड ०१ नमूद केल्यास तो श्रेणीसुधार ऐवजी नियमित विद्यार्थी होईल अशी प्रकरणे निदर्शनास आल्यास मंडळास चूकीची माहिती सादर केल्याबाबत नियमानुसार कनिष्ठ महाविदयालयाविरूद्ध गंभीर कारवाई करण्यात येईल.

अन्य महत्वाच्या सूचना

१. विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना सुधारित विषययोजनेबाबतचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र. २४३/१९ /एसडी-४ दिनांक ८ ऑगस्ट २०१९ नुसारच विषय विद्यार्थ्यास विषय घेणे आवश्यक आहे. या शासन निर्णयात नमूद केलेल्या विषय योजने व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रात चुकीच्या विषय योजनेनुसार विषय नमूद केल्यास विद्यार्थ्यांना निकाल जाहीर केला जाणार नाही व विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख जबाबदार राहतील.

२. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र अपलोड केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत शुल्क अचूक भरणा करावे. विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. जर मंडळात परीक्षा शुल्क जमा केल्याशिवाय विद्यार्थ्यांस परीक्षेस प्रविष्ट होवू दिल्याचे मंडळाच्या निर्दशनास आल्यास संबधितांवर मंडळ नियमानुसार कडक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

३. आवेदनपत्र अपलोड केलेल्या खाजगी विद्यार्थ्यांची मूळ नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate), पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, श्रेणी सुधार (C.I.S.) विद्यार्थ्याच्या गुणपत्रिका, तुरळक विषय (ISO) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांच्या छायांकित सत्य प्रतीवर आवेदनपत्र क्रमांक नोदवून विद्यार्थी प्रकारानूसार स्वतंत्र **गठ्ठे जमा करण्याची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.**

४. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) घेवून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या दोन भाषा विषय व दोन श्रेणीचे विषय अनिवार्य आहे. त्यानुसार आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावे. **तसेच भाषा विषयांची मौखिक परीक्षा व दोन श्रेणी विषयांची परीक्षा जवळच्या कनिष्ठ महाविदयालयामार्फत घेऊन सदर परीक्षेचे गुण/ श्रेणी मंडळ कार्यालयात सादर करणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस बंधनकारक आहे.**

टिप :- परीक्षा शुल्क जमा केल्याचे चलन व प्रिलिस्ट जमा करण्याची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

Digitally signed by
SHINDE JYOTSNA SANJAY
Date: 11-09-2025
17:02:25
(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र.विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.